■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३०८ ■ शनिवार दि.२६ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 308 ■ Saturday Dt. 26 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड जिल्ह्यात शिक्षक भरती घोटाळाप्रकरणी प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर व दलालांविरोधात एसआयटी चौकशी होणार?

### शिक्षण विभागातील 'देव माणूस' शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह च्या कारवाईकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष?

बीडच्या शिक्षण विभागात वाढत चाललेल्या भ्रष्टाचार, बोगस शिक्षक भरती आणि दलाली प्रकरणांमुळे सर्वसामान्य शिक्षक, विद्यार्थी आणि पालक हवालदिल झाले असताना, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह हे नाव आता एक आशेचा किरण ठरत आहे. शिक्षण क्षेत्रातील 'देव माणूस' म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या प्रतापसिंह यांच्या ठाम, निर्भीड आणि बिनधास्त कार्यशैलीकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील शिक्षक भरती घोटाळा असो किंवा इतर अनियमित भरती प्रकरणे, आयुक्त प्रतापसिंह यांनी कोणतीही भीडभाड न ठेवता दोषींवर थेट कारवाई सुरू करावी. त्यांनी आतापर्यंत अनेक गटशिक्षणाधिकारी, शाळाचालक, दलाल व संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी लावून धरली आहे. शिक्षणाच्या मंदिरात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर त्यांच्या 'झीरो टॉलरन्स' धोरणामुळे खळबळ उडाली आहे. जिल्ह्यांतील शिक्षक भरती, अनुदान प्रक्रियेतील गोंधळ, बनावट प्रमाणपत्रांवर मिळवलेली नोकरी अशा प्रकरणांची चौकशी आणि कारवाईच्या हालचालींमुळे अनेक 'मोठे मासे' गजाआड जाण्याची शक्यता आहे. शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांसाठी ही एक सकारात्मक सुरुवात मानली जात आहे.

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

### शिक्षक भरती गैरव्यवहार प्रकरणात तात्काळ कारवाईची इंजि.सादिक इनामदार यांची मागणी



जिल्ह्यातील बोगस शिक्षक भरती प्रकरणात संबंधित संस्थाचालक आणि शिक्षकांची चौकशी करून तात्काळ कारवाईचे आदेश द्यावेत, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजिनिअर सादिक इनामदार यांनी केली आहे. या प्रकरणातील भ्रष्टाचार गंभीर असून, चौकशी समितीमार्फत दोषींवर कठोर कारवाई व्हावी, जेणेकरून शिक्षण क्षेत्रातील विश्वास टिकून राहील, असे इनामदार यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी या मागणीसह संबंधित अधिकाऱ्यांना निवेदनही दिले आहे. दोषींवर कठोर शासन करावे अन्यथा मोठा जनआंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यांच्या या भूमिकेने प्रशासनाचे टेंशन वाढले आहे.

# पत्रकाराच्या नावाखाली बोगस शिक्षक भरती घोटाळा करणाऱ्या संस्थाचालक संपादक एसआयटीच्या रडारवर?

## बोगस शिक्षक भरती प्रकरणात व्हॉट्सअॅप कॉल आधारे चौकशी; संस्थाचालक, मुख्याध्यापक, दलालांसह सर्वजण एसआयटी तपासाच्या विळख्यात?

## बोगस शिक्षक भरती प्रकरण उघडकीस आणणाऱ्या 'सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ'ची निर्भीड पत्रकारिता उजळतेय!







बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गाजत असलेल्या शिक्षक भरती घोटाळ्याची फाइल आता अधिक गंभीर वळणावर आली आहे. या प्रकरणात दलाली करणाऱ्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यासह इतर दलालांवरही एसआयटी मार्फत चौकशीचा बडगा उगारण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेत कोट्यावधी रुपयांची आर्थिक देवाणघेवाण झाल्याचे पुरावे समोर आले असून, काही उमेदवारांनी पैसे देऊन शिक्षक पदे मिळवल्याचा आरोप केला आहे. संबंधित प्रकरणात बेडसकर यांचे नाव ठोसपणे पुढे येत असून, त्यांच्याशी संबंधित काही संशयित व्यक्तींकडूनही मोठी माहिती उघडकीस आली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने प्रकरण गंभीरतेने घेतले असून, विशेष तपास पथकाच्या माध्यमातून बेडसकर यांच्यासह इतर दलालांची सखोल चौकशी केली जाणार आहे. लवकरच काहींवर गुन्हे दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, या भरती प्रक्रियेत न्याय मिळावा, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी यासाठी सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ आणि अनेक उमेदवार तसेच पालकांनी आवाज उठवला आहे. त्यामुळे एसआयटीची ही कारवाई आता जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रातील शुचितेची कसोटी ठरणार आहे. शिवाय बोगस शिक्षकांचे थकीत वेतन वेतन अधीक्षक प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या कार्यालयामार्फत काढल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात संबंधित अधिकारी, काही मुख्याध्यापक आणि संस्थाचालकांनी संगनमत करून शासनाची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत आता एसआयटीमार्फत सखोल चौकशी करण्यात येणार असून, दोषींवर

► पान २ वर

### प्राथमिक शिक्षणाधिकारी फुलारी यांच्यापासून सावध राहा; सीईओ रहमान यांना सूचक इशारा?

जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी रहमान यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांच्या कारभाराकडे विशेष लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षक भरती, बदल्या आणि अनुदान प्रकरणांमध्ये फुलारी यांच्यावर सातत्याने गंभीर आरोप होत आहेत. जिल्हा परिषद बीड चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जितिन रहमान साहेब शिक्षण अधिकारी प्राथमिक भगवान फुलारी यांच्यापासून सावध राहा दुसऱ्या बदल चुकीची माहिती देऊन आपणा विषय सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधवांमध्ये रोष निर्माण होत आहे. सावध व्हा अशा चुकीच्या माहितीला दुर्लक्ष करा स्वतः सामाजिक कार्यकर्ते व पत्रकारांची माहिती आपण स्वतः घ्यावी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधव यांनी बातम्या व तक्रारी दिले असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध आपणास चुकीची माहिती शिक्षणाधिकारी फुलारी देत आहेत व काही सामाजिक कार्यकर्त्यांवर कारवाईसाठी आपण स्वतः यांच्या बोलण्या वरून वरिष्ठ अधिकाऱ्यांना सामाजिक कार्यकर्ते व पत्रकारांबाबत चुकीची माहिती दिली जात आहे साहेब आज पर्यंत कोणताच गुन्हा किंवा एकही तक्रार वीस वर्षापासून सामाजिक कार्यकर्ते अन्यायाच्या विरोधात लढत आहेत व भ्रष्टाचार करणारे शिक्षण अधिकारी भगवान फुलारी हे आपणास चुकीची माहिती देत असल्यामुळे अनेक सत्य सामाजिक कार्यकर्त्यांवरती जाणीवपूर्वक कारवाई होत आहे कारण की त्यांनी शिक्षक भरती घोटाळ्यापासून अलिप्त रहावे साहेब इतका पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते ब्लॅकमेलर किंवा पैशासाठी काहीही करत नसतात म्हणूनच त्यांच्यावरती खोटे गुन्हे दाखल करून त्यांना फसवत आहेत कारण की शिक्षक भरती घोटाळा बंद व्हावा हा त्यांचा प्राथमिक उद्देश आहे अशा चुकीच्या माहिती देणाऱ्या शिक्षणाधिकारी भगवान फुलारी पासून आपण सावध राहावे असे बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते तसेच आम जनतेतून जोराची चर्चा आहे.













### माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया राणी पाटील औरंगाबादवरूनच सांभाळत आहेत कार्यभार?

माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया राणी पाटील या औरंगाबाद येथे वास्तव्यास राहून बीड जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार सांभाळत असल्याचा गंभीर आरोप होत असून, शिक्षण विभागातील अनेक कामे रखडल्यामुळे संतप्त शिक्षक व पदाधिकारी वर्गात तीव्र नाराजी आहे. राजकीय वरदहस्ताच्या आशीर्वादाने त्या बीडमध्ये प्रत्यक्ष हजर न राहता कामकाज 'दूरस्थ' पद्धतीने चालवत असल्याचे बोलले जात असून, यामुळे माध्यमिक शिक्षण विभागात शिस्तीचा अभाव निर्माण झाला आहे. कार्यालयीन कामकाज, शिक्षकांच्या तक्रारी, नियुक्त्या व इतर आवश्यक कारवाया या सगळ्यांवर परिणाम होतो आहे. माध्यमिक शिक्षण विभाग हे केवळ पगार देण्याचे कार्यालय नाही, तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा आहे. जर जबाबदारी न पेलवली जात नसेल, तर राजकीय पाठबळाच्या जोरावर पद भूषवू नये, असा सल्ला काही शिक्षक नेत्यांनी दिला आहे. या प्रकरणाकडे शिक्षण आयुक्तालय लक्ष घालते का, आणि प्रिया राणी पाटील यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई होते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिक्षण क्षेत्रातील या भ्रष्ट जाळ्यात पत्रकारितेचा गैरवापर करून आर्थिक लाभ?

बीड जिल्ह्यात शिक्षक भरती घोटाळ्याचा व्याप दिवसेंदिवस वाढत असून आता यात पत्रकारितेच्या मुखवट्याआड लपलेल्या काही संपादकांचीही नावे समोर येऊ लागली आहेत. विशेषतः एका दैनिक वृत्तपत्राचा संपादक, ज्याने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला इतर पत्रकारांचे इसार घेत 'तुमच्या विरोधात कोणतीही बातमी प्रसिद्ध होणार नाही' असे आश्वासन दिले होते, त्याच्यावर मोठे आरोप झाले आहेत. संबंधित संपादकाने दुसऱ्याची खाजगी संस्था बळकावून त्यामार्फत बोगस शिक्षकांची भरती केली आणि त्यांच्या नावे थकीत वेतन काढून स्वतः मालामाल झाल्याचे धक्कादायक माहिती समोर आली आहे. या संपूर्ण प्रकरणात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा संशय असून आता विशेष तपास पथक या संपादकाचीही चौकशी करणार आहे. शिक्षण क्षेत्रातील या भ्रष्ट जाळ्यात पत्रकारितेचा गैरवापर करून आर्थिक लाभ घेणाऱ्यांवर कठोर कारवाई होण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. लवकरच या संपादकावर आणि संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे.

### 'सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ'च्या बातम्यांनी हलवली शिक्षण खात्याची यंत्रणा?

जिल्ह्यात गाजत असलेल्या बोगस शिक्षक भरती प्रकरणावर सातत्याने लक्ष ठेवून, भ्रष्टाचाराचा चेहरा उघड करणारे वृत्तपत्र म्हणून सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ याचे नाव आज अग्रस्थानी घेतले जात आहे. या निर्भीड वृत्तपत्राने कोणत्याही दबावाला बळी न पडता, शिक्षक भरतीतील अनियमितता, दलाली, आणि आर्थिक फसवणूक उघड करणाऱ्या सलग बातम्यांद्वारे जनतेच्या मनात विश्वास निर्माण केला आहे. या वृत्तपत्राने संबंधित अधिकारी, संस्थाचालक, दलाल यांच्यावर कठोर सवाल उपस्थित करत शासनाला आणि तपास यंत्रणांना या प्रकरणात लक्ष घालण्यास भाग पाडले. अनेक ठिकाणी सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या बातम्यांच्या आधारे चौकशीला गती मिळाल्याचे बोलले जात आहे. सत्य समोर आणण्यासाठी केलेल्या या निर्भीड पत्रकारितेचे जिल्हाभरात कौतुक होत असून, आरंभने पुन्हा एकदा सच्चाई लिहू, हक्कासाठी लढू आणि जिंकू ही आपली भूमिका अधोरेखित केली आहे.






# पंकजाताई मुंडे : महाराष्ट्राच्या राजकारणातील आत्मविश्वासाचं नाव

## लोकसेवेचा वसा घेऊन राजकारणाच्या संघर्षातून झळकणाऱ्या घडलेली जननेत्री म्हणजे पंकजाताई मुंडे

## पंकजाताईंना जनतेचा आशीर्वाद आणि महाराष्ट्राचं अभिमान

वाढदिवस विशेष । दिपक थोरात

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे केवळ एक मंत्री म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील नेत्री, जिद्दी नेतृत्व आणि जनतेशी जोडलेली लोकसेविका म्हणून त्यांची ओळख राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली आहे.
पंकजाताईंना राजकारण हा समाजसेवेचा एक सशक्त माध्यम वाटतो. वडील गोपीनाथ मुंडे यांचं प्रेरणास्थान आणि त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊन त्या जनतेच्या सेवेत कार्यरत आहेत.
लहानपणापासून ग्रामीण भागातील गरिबी, पाणीटंचाई, आरोग्याच्या समस्या आणि महिला सक्षमीकरण यांचा त्यांनी जवळून अभ्यास केला आणि त्यावर उपाययोजना करण्याची तळमळ मनाशी बाळगली. मंत्री म्हणून काम करताना त्यांनी पर्यावरण रक्षणात ठोस पावले उचलली. हरित क्रांती, वनसंवर्धन, वन्यप्राणी संरक्षण यांसारख्या उपक्रमांमध्ये त्यांची दूरदृष्टी दिसून आली. पशुसंवर्धन खात्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पशुपालकांना आधार देण्यासाठी त्यांनी अनेक योजनांची आखणी केली, शेतकऱ्यांना आधार देणारी व्यवस्था उभी केली.



पंकजाताईंना खास बनवणारा पैलू म्हणजे त्यांची सर्वसामान्यांशी नाळ. कुठल्याही कार्यक्रमात त्या जेवढ्या सहजपणे भाषण करतात, तेवढ्याच आपुलकीने त्या महिलांच्या समस्या ऐकतात, तरुणांच्या प्रश्नांना उत्तर देतात. त्यांच्या नेतृत्वात विश्वास वाटतो कारण त्या बोलतात तेच करतात. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची कन्या असणं हे केवळ ओळख नव्हे, तर एक मोठं जबाबदारीचं ओझं होतं. पण पंकजाताईंनी ती जबाबदारी मोठ्या आत्मविश्वासाने पार पाडली. सुरुवातीला वडिलांच्या छायेतून वाटचाल करताना, त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आणि नंतर स्वबळावर आपलं स्थान पक्कं केलं. त्या ग्रामीण भागाच्या समस्या समजून घेतात, महिला, शेतकरी, तरुण यांच्यासाठी नेहमी पुढाकार घेतात. जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि पशुधन विकासाच्या क्षेत्रात त्यांनी मंत्रालय पातळीवर नवे मापदंड निर्माण केले.
राजकारणात येणाऱ्या अडथळ्यांना त्यांनी संधी बनवलं, टीकांना उत्तर देण्याऐवजी कामगिरीतून दाखवून दिलं. राज्याच्या कोणत्याही भागात गेलं, तरी लोक म्हणतात – पंकजाताई म्हणजे आमच्या आवाजाची प्रतिनिधी. त्यांची भाषणशैली, लोकांशी संवाद, आणि विकासाच्या कामांकडे पाहण्याची तळमळ हे सगळं त्यांना इतरांपेक्षा वेगळं ठरवतं. आदर्श स्त्री नेतृत्व म्हणजे काय, हे त्यांनी वेळोवेळी सिद्ध केलं आहे. आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना लाखो शुभेच्छा मिळत आहेत. हा दिवस केवळ एका नेत्याचा वाढदिवस नसून, संवेदनशील नेतृत्व, खंबीर धोरणं आणि कार्यक्षमतेचं प्रतीक ठरलेली पंकजाताईंच्या संघर्षगाथेला सलाम करण्याचा दिवस आहे.
पंकजाताई या लोकशाहीच्या नाळेला जोडलेल्या नेत्या. त्यांच्या प्रत्येक निर्णयात, धोरणात आणि भाषणात जनतेची काळजी, भविष्याची चिंता आणि विकासाची दिशा स्पष्ट दिसते. महाराष्ट्रातील ग्रामीण भाग, विशेषतः मराठवाडा, या भागातील समस्या त्यांना अगदी खोलवर समजतात. पर्यावरण मंत्री म्हणून त्या वृक्षलागवड, जलसंवर्धन, हरित तंत्रज्ञान यासाठी ठोस उपक्रम हाती घेत आहेत. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पशुपालक महिलांना आर्थिक सक्षमतेकडे नेण्याचा प्रयत्न त्या करत आहेत. त्यांची नेतृत्वशैली ही कठोर निर्णय आणि मृदू संवाद यांचा सुंदर मिलाफ आहे. त्या सत्ता भोगण्यासाठी नाही, तर जबाबदारी पार पाडण्यासाठी राजकारणात आहेत. संघर्षातून पुढे आलेल्या या नेत्या महिला सक्षमीकरणासाठी एक प्रेरणास्थान ठरल्या आहेत. त्यांची कामं, त्यांचा दृष्टीकोन आणि त्यांची सर्वसामान्यांशी असलेली जवळीक हीच त्यांची खरी ताकद आहे.
आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे, कारण या नेत्या केवळ मंत्रिपदासाठी नव्हे, तर जनतेच्या मनामनात कायमच्या स्थायिक झालेल्या आहेत. पंकजाताईंना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या नेतृत्वाने महाराष्ट्र अधिक समृद्ध, हरित व सशक्त व्हावा हीच प्रार्थना.


# राज्यात गुटखा विक्रीवर बंदी असतानाही बीड जिल्ह्यात गुटख्याची साठवण

## पोलिसांची मोठी कारवाई; सुमारे २५ लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त केला

बीड । प्रतिनिधी

राज्यात गुटखा विक्रीवर बंदी असतानाही बीड जिल्ह्यात गुटख्याची तस्करी आणि साठवणुकीचे रॅकेट सुरूच असल्याचे पुन्हा स्पष्ट झालं आहे. केवळ २४ तासांच्या आत परळीव नेकनूर परिसरात पोलिसांनी वेगवेगळ्या कारवायांमध्ये सुमारे २५ लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व पानमसाला जप्त केला आहे. परळी येथून एक इसम अटकेत असून, नेकनूर येथील आरोपी मात्र अंधाराचा फायदा घेत फरार झाले आहेत.
पाच लाखांचा गुटखा जप्त परळी स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईत परळी तालुक्यातील उजनी पाटी येथे प्रतिबंधित गुटखा वाहतूक करणाऱ्या व्यक्तीला रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई २३ जुलै २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता करण्यात आली असून आरोपीचे नाव बालाजी सौदागर फड (वय २५, रा. धर्मापुरी, ता. परळी) असं आहे. त्याच्याकडून ५,३४,००० किमतीचा गुटखा व पानमसाला हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी संशयिताला अटक करून त्याच्यासह जप्त मुद्देमाल बर्दापूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिस निरीक्षक शिवाजी बटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार रामचंद्र केकान, नाईक पो. कॉ. गोविंद भताने, पो. कॉ. सचिन आंधळे यांनी ही कामगिरी केली. दोन वाहनांतून २०.७१ लाखांचा गुटखा जप्त, तर आरोपी फरार नेकनूर २४ जुलै रोजी मध्यरात्री १ वाजता, नेकनूर परिसरातील धुळे-सोलापूर महामार्गावर पोलिसांनी केलेल्या कारवाईत पिकअप व स्विफ्ट कारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गुटखा वाहतूक होत असल्याचे उघड झालं.
पोलिसांनी ही वाहने थांबवण्याचा प्रयत्न करताच स्विफ्ट कार (चक ०१ इढ ६१४४) पिकअपला येऊन आदळली आणि या गोंधळात दोन्ही वाहनांतील गुटखा व्यापारी पळून जाण्यात यशस्वी ठरले. वाहनांची झडती घेतली असता 'बाबा', 'विमल', 'रजनीगंधा' यांसारख्या कंपन्यांचा मोठ्या प्रमाणावर गुटखा आढळून आला. ज्याची किंमत २०,७१,०००/- (वीस लाख एकाहत्तर हजार रुपये) ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पो. कॉ. गोविंद राख, बाळासाहेब ढाकणे, शहजादे यांनी संयुक्तरीत्या केली.



# धानोरा रोडवरील रस्त्याची दयनीय अवस्था

## भरपावसात वंचितचे होडी चलाव आंदोलन आणि खड्ड्यांना दिला खासदार, आमदारांच्या नावाचा 'सन्मान'

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील धानोरा रोड परिसरातील ३० मीटरचा मुख्य रस्ता गेल्या पंधरा वर्षांपासून अत्यंत खराब स्थितीत असून, अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, नागरिकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. धुळीकाणामुळे व्यापारी वर्ग त्रस्त असून, विद्यार्थ्यांच्या ये-जा करण्यात अडचणी निर्माण होत आहेत.
सदर रस्त्यासाठी वर्ष २०१९-२० मध्ये डांबरीकरणाचे काम मंजूर झाले होते आणि कंत्राटदारास कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते. मात्र, एका व्यक्तीने भूसंपादन मावेजाच्या मागणीसंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दाद मागितल्यामुळे हे काम रखडले. जिल्हाधिकारी बीड यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, २०१४ पूर्वी हा रस्ता जिल्हा परिषद बीडच्या अखत्यारीत होता, म्हणून भूसंपादनासाठी जिल्हा परिषद जबाबदार आहे. संबंधित प्रस्तावही बांधकाम विभाग क्र. १, जि.प. बीड मार्फत सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.
मात्र, प्रकरण उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रलंबित असल्यामुळे काम पूर्णतः थांबवण्यात आले आहे. यासंदर्भात वंचित बहुजन आघाडी बीडच्यावतीने जिल्हाधिकारी, बीड नगरपरिषद व संबंधित लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.
प्रमुख मागण्या पुढे अशा मांडण्यात आल्या आहेत. रस्त्याचे काम थांबवण्यामागील नेमके कारण व न्यायालयीन प्रकरणाची माहिती जाहीर करावी. भूसंपादनाचा वाद तातडीने निकाली काढावा. उच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न व्हावेत. डांबरीकरणाचे काम त्वरित सुरू करावे. सदर मागण्यांकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून सतत दुर्लक्ष झाल्यामुळे वंचित बहुजन आघाडी बीडच्या वतीने होडी चलाव आंदोलन व खड्ड्यांचे नामकरण सन्मान सोहळा धानोरा रोड परिसरात आयोजित करण्यात आला. या आंदोलनात व्यापारी, विद्यार्थी, महिला आणि नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला.
नागरिकांच्या जिवीत सुरक्षिततेशी खेळणाऱ्या प्रशासनाच्या उदासीनतेचा निषेध करत आंदोलनात अनेकांनी रस्त्यावरील खड्ड्यांना नावं देत प्रशासनाच्या निद्रिस्त कारभारावर बोट ठेवलं. आता हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, सहसंघटक अर्जुन जंजाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेश कुमार जोगदंड, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, महिला जिल्हा उपाध्यक्ष पुष्पाताई तुरुकमाने, ता.किरण वाघमारे, शहराध्यक्ष लखन जोगदंड, संदीप जाधव, आकाश साबळे, शेख पाशाभाई, प्रकाश उजगरे, प्रदीप खळगे, राजाभाऊ घोषीर, सतीश क्षीरसागर, अभिजित बनसोडे, आप्पा पवार, मिलिंद सरपते यांच्यासह व्यापारी, शाळकरी विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला आहे.



### खड्ड्याला दिले खासदार आमदाराचे नाव

धानोरा रोडचे डांबरीकरणाचे काम तात्काळ पोलीस बंदोबस्तामध्ये करण्यात यावे या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने होडी चलाव आंदोलन करण्यात आले तसेच रस्त्यावरील खड्ड्यामध्ये तलावाचे स्वरूप आल्याने एका खड्ड्याला खासदार बजरंग बप्पा सोनवणे खड्डा, दुसऱ्या खड्ड्याला आमदार संदीप क्षीरसागर खड्डा आणि तिसऱ्या खड्ड्याला मुख्याधिकारी नीता अंधारे खड्डा असे नामकरण केले आहे. लवकरच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित दादा पवार व जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांचेही नाव खड्ड्याला देण्यासाठी धानोरा रोडला व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सांगितले.

# सांगवी (पाटण) येथील हातभट्टी अड्डा उद्ध्वस्त;आष्टी पोलिसांची कारवाई

आष्टी । प्रतिनिधी

ठाणे हद्दीतील सांगवी (पाटण) येथे गावठी दारू तयार करून त्याची चोरटी विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच आष्टी पोलिसांनी शुक्रवारी सायंकाळी सहाच्या दरम्यान धाड टाकुन गावठी दारूचा अड्डा उध्वस्त केला.
आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील सांगवी (पाटण) येथे गावठी दारू तयार करून त्याचा साठा ठेऊन तिची चोरटी विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांना मिळताच त्यांनी कडा पोलिस चौकीच्या कर्मचाऱ्यांना आदेशित करत शुक्रवारी सायंकाळी धाड टाकली असता ३० हजार रूपये किंमतीचे ३०० लिटर रसायन जप्त करून नष्ट करत आरोपी सिताराम पांडुरंग माळी रा.सांगवी(पाटण) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक शरद भुतेकर याच्या मार्गदर्शनाखाली कडा पोलिस चौकीचे पोलिस हवालदार अमोल नवले, नंदकिशोर सवासे, भाऊसाहेब आहेर पोलिस अंमलदार मजरूद्दीन सय्यद, प्रभाकर खोले, वाहन चालक प्रताप घोडके यांनी केली.








# ताईसाहेब मंत्री झाल्या, डोळ्याचे पारणे फिटले

## आ. नमिताताई मुंदडा यांनी व्यक्त केल्या भावना

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शेवटच्या क्षणी मला उमेदवारी मिळाली आणि त्याचे श्रेय पूर्णपणे ताईसाहेबांना म्हणजेच मा. ना. पंकजाताई मुंडे यांनाच जाते. त्यांच्याच आशीर्वादाने मी आमदार झाले. त्यावेळी विधानभवनात त्या माझ्यासोबत नव्हत्या, ही खंत होती. मात्र २०२४ मध्ये पुन्हा त्यांच्याच नेतृत्वामुळे माझा विजय झाला आणि आता त्या कॅबिनेट मंत्री झाल्या आहेत, हे पाहून मनोमन आनंद आणि समाधान वाटत आहे, असे भावनिक उद्गार आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांनी व्यक्त केले. आमदार मुंदडा पुढे म्हणाल्या, केज विधानसभा मतदारसंघात गेल्या पाच वर्षांमध्ये २,००० कोटींपेक्षा अधिक विकासकामं मार्गी लागली. ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत पायाभूत सुविधा निर्माण झाल्या. हे सर्व ताईसाहेबांच्या पाठबळामुळे शक्य झाले. मंत्रीपदाच्या माध्यमातून त्यांचं मार्गदर्शन अधिकच बळ देणार आहे. नमिताताईंनी सांगितले की, राजकीय नातं हळूहळू कौटुंबिक जिव्हाळ्यात परिवर्तित झालं. पंकजाताईंनी मला त्यांच्या भगिनी प्रितमताई, येशुताईसारखंच प्रेम दिलं. त्या केवळ राजकारणातल्या नेत्या नसून आमच्यासाठी मातृतुल्य व्यक्तिमत्व आहेत. माझ्या मुलींवर त्यांनी अगदी स्वतःच्या मुलासारखे प्रेम केलं, काळजी घेतली. आजही आमचं दैनंदिन संवाद असतो. जनतेची कामे कशी करावीत?, विकासाचे प्रश्न कसे मार्गी लावावेत ? लोकांच्या सोबत संवाद कसा करावा ? सामान्य लोकांचे प्रश्न कसे सोडवावेत? या बाबतीतले सारे मार्गदर्शन मला ताईसाहेबांनी केलं. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय कोणताही निर्णय घेत नाही. लोकसभा निवडणुकीच्या वेळी आमचं संपूर्ण कुटुंब रात्रंदिवस प्रचारात होतं. पराभव होईल असं वाटलंच नव्हतं. मात्र तो धक्का बसल्यानंतर त्यांनीच आमच्या डोळ्यातलं पाणी पुसलं. त्यांच्या नेतृत्वात संयम, संघर्ष, त्याग, आणि सेवा वृत्ती आहे. त्यामुळे त्या मंत्री झाल्याचं समाधान शब्दात व्यक्त करता येत नाही, असेही नमिताताईंनी सांगितले.
नमिताताईंनी यावेळी मंत्री पंकजाताई मुंडेंच्या नेतृत्वाविषयी गौरवोद्गार काढताना म्हणाल्या, प्रशासनाची सूत्रे कशी चालवायची, लोकसंपर्क कसा ठेवायचा, आणि निर्णय घेताना सर्वसामान्यांचा विचार कसा करायचा हे सर्व आम्ही ताईसाहेबांकडून शिकलो. विधानभवनात त्या आमच्यासोबत आहेत, हे मी माझं भाग्य मानते. त्या मंत्रीपदी विराजमान झाल्याचा आनंद मला माझ्या आमदारकीच्या विजयापेक्षाही अधिक वाटतो. मातोश्री प्रज्ञाताई, प्रितमताई आणि येशुताई यांच्यासोबत आम्हा साऱ्यांचे एक कौटुंबिक ऋणानुबंध आहेत. मंत्रीपदाच्या माध्यमातून आता ताईसाहेब सतत आमच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या आहेत. त्यांना उत्तम आरोग्य लाभो आणि त्या जनतेची सेवा करत राहाव्यात, हीच माता योगेश्वरीच्या चरणी प्रार्थना, असे नमिताताईंनी आपल्या भावना शेवटी व्यक्त केल्या.

शब्दांकन : राम कुलकर्णी



पान १ वरून...

### पत्रकाराच्या नावाखाली बोगस शिक्षक भरती घोटाळा करणाऱ्या संस्थाचालक संपादक एसआयटीच्या रडारवर?

लवकरच गुन्हे दाखल होणार आहेत. तसेच, बोगस पद्धतीने काढलेले सर्व पैसे शासन खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे अधिकृत सांगितले जात आहे.
बोगस शिक्षक भरती प्रकरणात आता चौकशी अधिक गहिर होत चालली आहे. शिक्षण अधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) तसेच वेतन अधीक्षकांशी दूरध्वनी व व्हॉट्सअॅप कॉलद्वारे संपर्क साधून भरतीबाबत चर्चा करणाऱ्या सर्व संबंधितांवर आता एसआयटीमार्फत तपासाचा फास आवळला जात आहे. ज्यांनी शिक्षण विभागाशी थेट संपर्क साधत बोगस शिक्षक भरतीच्या संदर्भात चर्चा केली अशा खाजगी संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच संस्थेचा आर्थिक कारभार पाहणारे दलाल यांची कॉल डिटेल्स, चॅट्स आणि व्यवहार तपासले जाणार आहेत. या सर्वांवर गंभीर आरोप असून, प्राथमिक चौकशीत अनेक ठिकाणी आर्थिक व्यवहाराचे ठोस पुरावे मिळाल्याचे समजते. त्यामुळे एसआयटी आता सर्व डिजिटल पुराव्यांच्या आधारे संबंधितांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याच्या तयारीत आहे. जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेला गैरव्यवहार आणि त्यामागचे रॅकेट उघडकीस आणण्यासाठी ही चौकशी निर्णायक ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

पान ३ वरून...

### मॅटर मिटवून घ्या हे सांगण्याचे अधिकार...

शिवीगाळ करत मारहाण करण्याची धमकी दिली. तेलगाव येथील पतसंस्थेच्या शाखेतून महिलांना कर्ज दिले जाते. त्यामध्ये कर्जदार केशरबाई बबन मोरे यांना सन २०२१ साली ५० हजार रूपये कर्ज देण्यात आले होते. कर्जवसुलीसंदर्भात कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी भेटी दिल्या. वसुलीपोटी त्यांनी जामीनदार (पती) बबन लिंबाजी मोरे यांचे दिलेल्या चेकद्वारे १० हजार रूपयांची रक्कम पतसंस्थेकडून कपात केली. कपात रक्कमेचा राग मनात धरून कर्जदार केशरबाई मोरे यांनी शिवीगाळ करून मारहाणीची धमकी दिल्याचा आरोप पतसंस्तेच्या अध्यक्षा शितल मोरे यांनी तक्रारीत केला आहे. त्याचबरोबर बबन मोरे यांनी शितल मोरे यांचे पती लक्ष्मण मोरे यांचा मोबाईल पळवून नेला आहे. कपात झालेली १० हजाराची रक्कम परत करा तरच मोबाईल परत देईल असे म्हणत बबन मोरे हा शिवीगाळ करून जिवे मारण्याची व माझ्यापतीवर खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचे शितल मोरे यांनी तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणात पोलिसांनी केवळ तक्रार अर्ज घेवून ठेवला आहे. आता गुन्हा दाखल करायला ढाकणे साहेब, नेमका कशाचा मर्हत पाहत आहेत असा प्रश्न उपस्थित होव लागला आहे.




# अवघ्या दोन वर्षाच्या आतच ध्रुव युवराज चरखा याने कोरले वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव

बीड । प्रतिनिधी
ध्रुव युवराज चरखा या मुलाने वयाची दोन वर्ष पूर्ण करण्या अगोदरच जागतिक विक्रम स्वतःच्या नावे केला. ज्या वयात लहान मुले गेम्स, व्हिडिओ, रिल्स, टीव्ही बघणे यामध्ये व्यस्त असतात, त्या वयात ध्रुव, मराठी मध्ये महिने, इंग्लिश महिने, मराठी तसेच इंग्लिश मध्ये अंक, विविध श्लोक, विविध देशाचे ध्वज ओळखणे, आठवड्याचे दिवस सांगणे, प्राणी, पक्षी, भाज्या, फळे, दिशा अचूक ओळखतो. पाढे बोलून समोरच्या व्यक्तीला अवाक करतो.
दीड वर्षाचा असल्यापासून त्याने हे बोलून दाखवायला सुरुवात केली. हळूहळू करत त्याने विविध गोष्टी आत्मसात केल्या. मुळात कमी स्क्रीन टाईम कमी, हेल्दी डायट करणे, परिवारासोबत संवाद, प्रश्न या सर्व गोष्टींनी त्याला पुढे जायला मदत केली. त्याच्या या सर्व कार्याची नोंद WORLDWIDE BOOK OF RECORD मध्ये झाली. त्याच्या या बालकामगिरीने बीड जिल्ह्याच्या धर्तीवर मानाचा तूरा रोवला. परिश्रम, सातत्य, जिद्दीमुळे हे सर्व ध्रुव ला शक्य झाले.

# नारेवाडी ग्रामस्थांची श्री क्षेत्र भगवानगडाला ५३ लाख रुपयांची देणगी जाहीर

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

भगवानगड । प्रतिनिधी
श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.



श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे नारेवाडी (ता.केज जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ५३ लाख रुपये झाली.
नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# आपला नेता आमदार व्हावा यासाठी दत्ताभाऊंचे बजरंगबलीला साकडे

## आमदार विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये फेडणार नवस

गेवराई । प्रतिनिधी
आपला नेता आमदार व्हावा यासाठी कार्यकर्ता जीवापाड प्रेम करत आपल्या नेते विषयी असलेली आपुलकी जोपासत असतो नेत्यांच्या अनेक निवडणुकीत कार्यकर्ता हा जिवापाड मेहनत घेऊन तळमळीने काम करत असताना सर्व– समभाव एकात्मता आणि बंधुता या समतेचे चाक गतिमान करत सर्वांना विश्वासात घेऊन आपल्या नेत्यांच्या लोकप्रियतेला अधिक बळ मिळावे आणि आपल्या नेत्याला निवडणुकीच्या रणांगणात यशस्वी मैदान गाजवण्यासाठी शक्तिशाली बजरंग बली यांच्या कृपेने नेता आमदार व्हावा यासाठी एका सामान्य शेतकरी पुत्राने भगवंताकडे साकडे घातले आहे.
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांचे कट्टर समर्थक दत्ताभाऊ वाघमारे यांनी विजयसिंह पंडित हे बजरंगबली चे कट्टर भक्त असल्याने श्रावणच्या पहिल्या शनिवारी जर विजयसिंह पंडित आमदार झाले तर मनोभावातून श्रावणच्या पहिल्या शनिवारी महापंगत देऊन बजरंग बलीच्या प्रथमेचे पूजन आमदाराच्या हस्ते करू असं साकडं बजरंग बलीला घातलेलं होतं आणि त्या निमित्ताने येत्या श्रावण शनिवारी सकाळी १० वाजता नवस आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते फेडण्यात येणार आहे. नवस किंवा प्रतिज्ञा करणे म्हणजे प्रमाणिकपणाचे वचन देणे, नवस बोलताना आपण आपल्या अडीअडचणी, इच्छा किंवा समस्या देवा समोर व्यक्त करत आसतो आणि त्या पुर्ण झाल्यावर मनात बोललेली इच्छा ईश्वर चरणी नतमस्तक होऊन वचनपूर्ती करत आसतोत, म्हणजे देवाला दिलेले वचन पूर्ण करतो, आसच एक नवस पंडित परीवाराचे कट्टर समर्थक तथा युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ताभाऊ वाघमारे यांनी विजयसिंह पंडित आमदार झाल्यावर श्रावणाच्या पहिल्या शनिवारी महापंगत देऊ आसा नवस बोलला होता, त्याच अनुषंगाने विजयसिंह पंडित आमदार व्हावे म्हणून बजरंगबली ला केलेलं साकडं श्रावणच्या पहिल्या शनिवारी आमदारांच्या हस्तेच पूर्ण होणार असल्याचे माहिती दत्ताभाऊ वाघमारे यांनी सांगितली.



# माजलगावात साहित्यरत्न आणाभाऊ साठे जन्मोत्सवाचे आयोजन : उपसरपंच अनिल कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी
लोकशाहिर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जन्मोत्सव २०२५ चे आयोजन शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात अनिल राधे कांबळे मित्र परिवाराच्या वतीने दि. ३० जुलै रोजी करण्यात आले असुन भव्य मोटारसायकल रॅली, गायनाचा कार्यक्रम असे उपक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजक उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी दिली आहे.
कार्यक्रमाचे उद्घाटन मा. मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते होणार असुन अध्यक्षस्थांनी मा. सभापती नितीन नाईकनवरे, मिलींद आवाड, मोहन जगताप, आमदार प्रकाश सोळंके, ओमप्रकाश शेटे, बाबुराव पोटभरे, सहाल चाउस यांची विशेष उपस्थिती असणार आहे. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. सुरेश साबळे, शिवाजी रांजवण, सुशिल डक, मनोज जगताप, सचिन सानप, राजेश मेंडके, डॉ. दिनकर मस्के, नारायण भले, पद्माकर कांबळे, कचरू कांबळे, संपादक दीपक थोरात, सभापती जयदत्त नरवडे, मा. सभापती कल्याण आबुज, मा. नगरसेवक विनायक रत्नपारखी, शरद यादव, दीपक मेंडके, इरफान खान, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शिवाजी सुतार, सरपंच राज अर्जुन, सरपंच अजय शिंदे, दयानंद स्वामी, भास्कर शिंदे, मानवी हक्क अभियानचे राजेश क्षीरसागर, मधुकर कांबळे, दत्ता कांबळे, अमोल शेरकर, एकनाथ मस्के, विठ्ठल तूपसुंदर, सदानंद प्रधान, ज्ञानेश्वर सरोदे, येसूब आतार, अनिल भिसे, डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले, डॉ. यशवंत गाडगे, डॉ. अमोलर परतुरकर यांची उपस्थिती असणार आहे. दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी १०. ३० वाजता भव्य मोटारसायकल रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकांपर्यंत काढण्यात येणार आहे तर शाहीर शितल साठे, युवराज ढगे, गायक सुमित साळवे आणि संच यांचा गायनाचा कार्यक्रम होणार आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक उपसरपंच अनिल राधे कांबळे, संयोजक रोहित भिसे, जयंती उत्सव समिती अध्यक्ष विक्रांत कांबळे, उपाध्यक्ष संकेत कांबळे, सचिव श्याम कांबळे, सहसचिव मनोज गायकवाड, कोषाध्यक्ष युवराज कांबळे, सहकोषाध्यक्ष शुभम भिसे, सदस्य प्रदीप कांबळे, प्रवीण कांबळे, सदस्य सुहास शिरसागर, सदस्य मयूर कांबळे यांचेसह अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.





तलवाडा येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक झाल्याने समाजातील स्वाभिमानी चिमुकल्या पुतळ्याच्या समोरुन येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना व पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी येत असलेल्या अनुयायांना पेढे वाटताना दिसल्या आणी माझ्या मनातील आनंद गगनात मावेनासा झाला या लहान चिमुकल्यांचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यावरचे प्रेम दिसुन आले या तिन्ही चिमुकल्यांचे मनापासून अभिनंदन.




# मॅटर मिटवून घ्या हे सांगण्याचे अधिकार एपीआय ढाकणेंना कसे?

## एसपी साहेब, २४ तासात एनसीची दखलचा फज्जा उडाला आदेश तुम्ही दिले मात्र तक्रार देवून ५ दिवस झाले तरीही दिंद्रुड पोलिसांनी ना एनसी दाखल केली ना एफआयआर



बीड । प्रतिनिधी
पतसंस्थेत येऊन सर्व कर्मचाऱ्यांसमोर शिवीगाळ करत मारहाण करण्याची धमकी दिल्याचा प्रकार कारी (ता. धारूर) येथील जिजाऊ महिला नागरी पतसंस्थेत घडला. याप्रकरणात दि.१८ जुलै रोजी दिंद्रुड पोलिस ठाण्यात पतसंस्थेच्या अध्यक्षा शितल लक्ष्मण मोरे यांनी तक्रारही दिली. मात्र पोलिसांनी तक्रार अर्ज सुध्दा घेतला नाही. त्यानंतर २० तारखेला पुन्हा अर्ज दिला तो केवळ ठेवून घेतला. याप्रकरणात पाच दिवस झाले



तरीही ना एनसी दाखल झाली, ना एफआयआर झाला. दिंद्रुड ठाण्याचे एपीआय ढाकणे साहेब, मात्र हे तुमचं घरचं मॅटण आहे. घरच्याघरी मिटवा असे सांगत आहेत. तक्रार देवूनही दखल घेतली जात नसेल आणि मिटवामिटवीचा सल्ला दिला जात असेल तर उद्या कोणीच तक्रार द्यायला पुढे येणार नाही. एकीकडे एसपीसाहेबांनी २४ तासात एनसी दाखल करून कारवाईच्या सुचना दिल्या आहेत. मात्र दुसरीकडे त्यांचेच अधिकारी त्यांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करून पाच-पाच दिवस एनसी किंवा एफआयआर दाखल करून घेत नसतील तर हा प्रकार म्हणजे एसपी साहेबांच्या संकल्पनेला हरताळ फासण्यासारखाच असल्याची चर्चा होवू लागली आहे.
धारूर तालुक्यातील कारी येथील जिजाऊ महिला नागरी पतसंस्थेत दिनांक १७ जुलै २०२५ रोजी कर्जदार केशरबाई बबन मोरे यांनी संस्थेत येवून सर्वासमोर २/४ पतसंस्थेच्या अध्यक्षा शितल लक्ष्मण मोरे यांना

पान २ वर

# विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी
शासकिय सेवेत कर्तव्यदक्ष राहून सामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांच्या न्याय हक्काचे निर्णय घेणाऱ्या, गैरप्रकार करणाऱ्यांवर तालुका दंडाधिकारी म्हणून कठोर भूमिका घेऊन कायद्याने कारवाई करणाऱ्या, शासकिय सेवेत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या कार्याची दखल घेत 'नवभारत/नवराष्ट्र' तर्फे मराठवाडा आयकॉन म्हणून सन्मान करण्यात आला. हा सन्मान सोहळा कार्यक्रम संभाजी नगर येथे हॉटेल रामा इंटर नॅशनल येथे रविवार २० जुलै रोजी पार पडला. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते तहसिलदार चंद्रकांत शेळके यांना मराठवाडा आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी नवभारत समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए. श्रीनिवास, सरव्यवस्थापक कल्याण पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.
बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे शिक्षण बी.ए., डी.एड. झालेले असून त्यांचे मुळ गाव जळगाव जिल्ह्यात आहे. त्यांना विविध विषयांवर लेखनाची आवड असून त्यांचे प्रासंगिक लेख विविध वर्तमानपत्रांमधून प्रकाशित झालेले आहेत. वैयक्तिक जीवनात सामाजिक, प्रर्यावरण, साहित्य क्षेत्रात त्यांचा सक्रीय सहभाग असतो. ते ४ ऑगस्ट २००४ रोजी शासकिय सेवेत दाखल झाले. सद्य स्थितीपर्यंत गेवराई, गंगापूर, घनसांगवी, पैठण, अंबड या ठिकाणी तहसीलदार म्हणून सेवा बजावली असून सध्या बीड येथे तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत, असे यावेळी कार्यक्रमात सांगण्यात आले.
तहसीलदार शेळके हे बीडला रुजू झाल्यापासून त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या कामांचा धडाका लावला आहे. विशेषत: शिव पानंद रस्ते खुले करून देण्यासाठी ते स्वत: जातीने हजर राहून रस्ते खुले करून देत आहेत. कार्यालयात येणाऱ्या लोकांशी सौजन्याने वागून प्रत्येकाचे प्रश्न समजून घेत आहेत. त्यामुळे बीडच्या जनतेला ते आपलेसे वाटायला लागलेले आहेत. २०१२ ते २०१५ या कालावधीत गेवराईला तहसीलदार असताना तहसीलदार शेळके यांनी नागरिकांचे अनेक प्रश्न लावले होते. सुमारे शंभर किलोमीटर रस्ते त्यांच्या कालावधीत झाले होते. त्यामुळे गेवराईचे नागरिक अजूनही त्यांची आठवण काढतात. त्यावेळी जिल्हाधिकारी म्हणून सुनील केंद्रेकर कार्यरत होते. केंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अनेक




लोकहिताचे उपक्रम राबविले होते. २०१४ साली दुष्काळाच्या कालावधीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल बीडच्या वृत्तपत्रांनी त्यांची दखल घेऊन विशेष बातम्या ही छापल्या होत्या. संभाजीनगरमधील गंगापूर व पैठण येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असताना विविध निवडणुका शांततापूर्ण पद्धतीने घेणे, संजय गांधी श्रावण बाळ योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे, रस्ते काढून देणे यासाठी स्थानिक शेतकरी आजही त्यांचे नाव घेतात. २०२३ साली अंबड येथे कार्यरत असताना मनोज जरांगे यांचे उपोषण, यावेळी झालेला लाठी हल्ला आणि एकंदरीतच कायदा व व्यवस्था याबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला होता. वरिष्ठांच्या मदतीने ही परिस्थिती कुशलरीत्या हाताळल्यामुळे तहसीलदार शेळके यांचा अनुभव अधिकच दुणावला.
विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आपल्या मनोगतात असे सांगितले की, मराठवाडा आयकॉन मिळाल्याने आपली जबाबदारी अधिक वाढते. 'आयकॉन' या शब्दाचा अर्थ मी कोण? असा होतो, त्यामुळे आपण स्वत:ची ओळख जाणून समाजासाठी सातत्याने कार्यरत राहणे आवश्यक आहे. हा पुरस्कार केवळ सन्मान नसून इतरांना आणि स्वत:लाही प्रेरणा देणारा आहे. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी 'मराठवाड्याचे' मुख्य आकर्षण 'मराठवाडा आयकॉन पुरस्कार वितरण समारंभ', हे ठरले आहे, असे नमूद केले. या सोहळ्यात मराठवाड्यातील विविध भागात आणि विविध क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती आणि संस्थांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे समाजात जागृती निर्माण होत आहे आणि सकारात्मक बदल घडत आहेत, असे नमूद केले. त्यांनी नवभारत समूहाचे कौतुक करताना सांगितले की, नवभारत / नवराष्ट्रने सुरू केलेला हा उपक्रम समाजासाठी अत्यंत चांगला आहे. समाजातील प्रेरणा देणाऱ्या लोकांना पुढे आणणे ही काळाची गरज आहे. तसेच सरकार कुठे चुकते याबाबत परखड भूमिका घेणेही आवश्यक आहे, कारण अशा मतांमुळे समाजाला योग्य दिशा मिळते. नवभारत समूहाचे याबद्दल मन:पूर्वक कौतुक आहे.
विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, नवभारत समूहाचा हा स्तुत्य उपक्रम आहे. समाजात ज्या लोकांनी उल्लेखनीय कार्य केले आहे, त्यांचे कार्य माध्यमांनी पुढे आणणे गरजेचे आहे. बीड तालुक्यातील मसेवाडी मुळकवाडी येथील वादग्रस्त रस्ता, ढेकणमोह येथील वादग्रस्त शिवरस्ता असो की यासारखे अनेक रस्त्यांचे प्रश्न असो, तहसीलदार शेळके यांनी चुटकीसरशी मार्गी लावले. असे तहसीलदार मिळाले तर तालुक्यातील प्रश्न शिल्लकच राहणार नाही अशी बीडच्या सर्वसामान्य जनतेची भावना या निमित्ताने प्रकर्षाने जाणवली. अशा शासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान करणे उचितच आहे. यानिमित्ताने त्यांच्या पुढील कार्यास, पुढील वाटचालीस शुभेच्छा !

# धनंजय मुंडे मंत्रिपदाच्या वाटेवर, उपमुख्यमंत्री अजितदादांचा दिलासा?

## राजकारणात नवा रंग : अजित पवारांच्या वक्तव्याने वाढली उत्सुकता!

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरत आहे. धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद पुन्हा बहाल होणार का? राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच दिलेल्या वक्तव्यातून या चर्चांना अधिकच उधाण आले आहे. धनंजय मुंडे सध्या जिल्ह्यापातळीवर मोठ्या प्रमाणात सक्रिय असून, कार्यकर्त्यांमध्येही त्यांच्या पुनर्नियुक्तीची मोठी उत्सुकता आहे. बीड जिल्ह्यातील स्थानिक पातळीवर त्यांचा प्रभाव कायम असून, मंत्रिपद मिळाल्यास जिल्ह्याच्या विकासालाही गती मिळू शकते, अशी भावना समर्थकांमध्ये आहे. राजकीय वर्तुळात हे वक्तव्य 'धनंजय मुंडेंना दिलासा' मानले जात असून, आता मंत्रिमंडळ विस्तारात त्यांचे नाव निश्चित होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

पावसाळी अधिवेशनानंतर महाराष्ट्रातील राजकीय हालचाली वाढल्या आहेत. एकीकडे महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल करण्यात येणार असल्याची जोरदार चर्चा आहे. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी धनंजय मुंडेंच्या मंत्रिमंडळातील कमबॅकवर मोठं विधान केलं आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी(दि.२५) पुण्यात मीडियाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी धनंजय मुंडेंच्या मंत्रिमंडळातील पुन्हा एन्ट्रीवर थेट भाष्य केलं. ते म्हणाले, धनंजय मुंडेंच्या बाबतीमध्ये तुम्ही पेपरला वाचलं, त्यांच्यावर कृषी विभागाचे जे आरोप झाले त्यावर न्यायालयानं काय सांगितलं? त्यांना त्या प्रकरणात क्लिनचिट देण्यात आल्याचं अजित पवारांनी म्हटलं. तसेच कृषी विभागातील त्या प्रकरणात धनंजय मुंडेंचा कुठेही दोष नाहीये, आता अजून त्यांच्या संदर्भातील एक गोष्ट आहे, त्यावर देखील पोलीस यंत्रणा त्यांच्या पद्धतीनं कारवाई करत आहे, या प्रकरणात जर त्यांना क्लिनचिट मिळाली तर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात संधी देऊ, असं विधान अजित पवार यांनी केल्यामुळे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

अजित पवारांनी जर वाल्मिक कराड प्रकरणातून धनंजय मुंडेंना क्लिन चीट मिळाल्यानंतर आणि त्या प्रकरणाशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचं सिद्ध झालं,तर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिपद देऊ, असं वक्तव्य अजितदादांनी पुण्यात केलं आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी वाल्मिक कराडवर यांच्यासह धनंजय मुंडेंवरही गंभीर आरोप करण्यात आले होते. हे सगळं सुरू असताना भाजप आमदार सुरेश धस आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुंडेंच्या कृषिमंत्री पदाच्या कार्यकाळात कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत खळबळ उडवून दिली होती. त्यानंतर त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर आता धनंजय मुंडे हे पुन्हा मंत्रिपदावर येणार असल्याच्या चर्चा सुरू आहे.





# परळीत झाली नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाला ७२ एकर जमीन मंजूर

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्र उभारणीसाठी राज्य शासनाने ७२ एकर शासकीय गायरान जमीन उपलब्ध करून दिली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष प्रयत्नामुळे जिल्ह्याच्या पशुसंवर्धन आणि कृषी क्षेत्राच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या अंतर्गत हे महाविद्यालय परळी येथे स्थापन केले जाईल. यासाठी मौजे लोणी (ता. परळी) येथील २२ एकर तर मौजे परळी येथील ५० एकर जमीन विनाशुल्क व महसूलमुक्त किंमतीने प्रदान करण्यात आली आहे.

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार**

ग्रामपंचायत लोणी यांच्या ठरावांना तसेच जिल्हा परिषद, बीड यांच्या शिफारशीला विचारात घेऊन हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या जमीन वापरासंदर्भात शासनाने काही अटी व शर्ती घातल्या असून या जमिनीचा वापर केवळ पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय आणि पशुधन प्रक्षेत्रासाठीच केला जाईल. जमिनीची विक्री, गहाण किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांच्या आत मंजूर प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक राहील. अटींचा भंग झाल्यास किंवा भविष्यात शासनाला सार्वजनिक कामासाठी जमिनीची आवश्यकता भासल्यास, ती परत घेण्याचा अधिकार शासनाकडे सुरक्षित राहील. या प्रकल्पामुळे लगतच्या शेतकऱ्यांना किंवा खातेदारांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे बीड आणि आसपासच्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना पशुवैद्यकीय शिक्षणाची उत्तम संधी मिळेल, तसेच या भागातील पशुधनाच्या आरोग्यासाठी आणि विकासासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल.



# परळी वैजनाथमध्ये २१७ किलो चंदन पकडले

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहराच्या उपनगरात चंदन तस्करीचा मोठा प्रकार उघडकीस आला आहे. बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीनंतर टाकलेल्या धाडीत सुमारे २१७ किलो चंदन लाकूड जप्त केले असून त्याची अंदाजित किंमत ८ लाख ६८ हजार रुपये आहे. मात्र छाप्यावेळी संशयित चंदन तस्कर हे घटनास्थळावरून फरार झाले.

ही कारवाई २३ जुलै रोजी रात्री ८.३० वाजता करण्यात आली. परळी वैजनाथ रेल्वे पटरीच्या उत्तर बाजूस इराणी गल्लीच्या परिसरात काही तस्करांनी कापडी पालांमध्ये मोठ्या प्रमाणात चंदन साठवले असल्याची माहिती बीड एलसीबी पथकाला मिळाली होती. पथकाने तत्काळ त्या ठिकाणी धाड टाकली. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच संशयित घटनेच्या काही क्षणांपूर्वीच फरार झाले. ही कारवाई बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात हवालदार रामचंद्र केकान, नाईक पोलिस कॉन्स्टेबल गोविंद भताने, पो. कॉ. सचिन आंधळे यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या वेळीच आणि योजनाबद्ध कारवाईमुळे मोठ्या प्रमाणावर चंदन तस्करी रोखण्यात यश आले आहे. मात्र परळी व परिसरात मागील काही महिन्यांपासून चंदन लाकूड तस्करीचे रॅकेट सक्रिय असल्याचे संकेत मिळत होते. ही कारवाई केवळ एका टोळीचा भाग असण्याची शक्यता असून मागील कारवाया व साखळी तस्करीच्या दिशेने तपास सुरु आहे. या घटनेप्रकरणी परळी संभाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक तयार करून पाठविण्यात आले आहे.

# वडवणीत सर्वपक्षीय चक्काजाम आंदोलन

वडवणी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या व दिव्यांगाच्या प्रश्नांवर प्रहारचे सर्वेसर्वा माजी मंत्री बच्चू कडू राज्य सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरले आहेत. त्यामुळे दि.२४ जुलै वार गुरुवार रोजी राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन करण्यात आले असून सर्वपक्षीय यांच्यावतीने शेतकरी, कष्टकरी, दिव्यांग, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार व कामगार यांच्या १७ मागण्यांसाठी राज्यव्यापी रास्तारोको आंदोलन करण्यात आले आहे.



यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, ऊस, दुधाला पुरेसा दर, दिव्यांगांना वाढीव मानधन त्यासोबतच इतर १७ विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी वडवणी तालुक्यातील सर्व पक्षीय नेत्यांनी या आंदोलनासाठी पाठिंबा दर्शविला असून वडवणी शहरातील बीड-परळी राज्य महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि.२४ जुलै गुरुवार रोजी चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी राज्य सरकारच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी देखील करण्यात आली आहे. यावेळी नगराध्यक्ष शेषेराव जगताप, शिवसेना उबाठा गटाचे तालुकाप्रमुख विनायक मुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, मराठा सेवक संतोष डावकर, युवराज शिंदे, विश्वास आगे, सुग्रीव मुंडे, दत्तात्रय जमाले, संभाजी दराडे, रामेश्वर जेधे, अंकुश नाईकवाडे, बबन मांजरे, संकेत लंगडे, हरिश बादाडे सह आदी उपस्थित होते.

# फोन पे वरून ८४ हजार रुपयाची फसवणूक

## अंबेजोगाई शहर पोलिसांनी दोन तासात आवळल्या आरोपीच्या मुसक्या

अंबेजोगाई । प्रतिनिधी

फोनपेवरून ८४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसांनी अविनाश देवकर आणि अझर पठाण या दोघा आरोपींना केवळ दोन तासांत अटक केली. पोलिसांनी या दोघांकडून ७४ हजार रुपये जप्त केले आहेत. पोलिसांच्या या तात्काळ कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कोळकानडी (ता. अंबाजोगाई) येथील रहिवासी आणि व्यवसायाने गॅरेज चालक असलेले सोमनाथ मदन ढगे यांची ८४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. अंबाजोगाईतील अविनाश शंकर देवकर (रा. वडारवाडा) आणि अझर अब्दुल रहमान पठाण (वय ३२, रा. पेन्शनपुरा) या दोघांनी मिळून फोनपेवरून ही रक्कम फसवणूक करून काढून घेतली.



याप्रकरणी सोमनाथ ढगे यांच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात २२ जुलै २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आरोपींविरुद्ध यापूर्वीही जबरी चोरी व अन्य गुन्ह्यांचे गुन्हे अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात नोंदवलेले आहेत. या गुन्ह्याच्या गंभीरतेची दखल घेत पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शरद जोगदंड, सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे, पोलिस उपनिरीक्षक शिंदे, तसेच पोलिस अंमलदार श्रीकृष्ण वडकर, मनोज घोडके, रवीकुमार केंद्रे, हनुमंत लाड, हनुमंत चादर, पांडुरंग काळे आणि भागवत नागरगोजे यांनी तात्काळ कारवाई करत अवघ्या दोन तासांत दोन्ही आरोपींना अटक केली. तसेच फसवणुकीत गेलेले ७४,००९ रुपये हस्तगत केले. अंबाजोगाई शहर पोलिसांनी केलेल्या या जलद आणि प्रभावी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# पप्पुजी कागदे यांच्या हस्ते प्रेशर पाईपलाईनचे उदघाटन

बीड । प्रतिनिधी

शहरातील राजुरीवेस जिल्हा मध्यवर्ती बँक, भिमराज नगर बौद्ध विहार या भागात गेल्या तीस वर्षापासून पाण्यापासून बंचित होता. परंतु रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पुजी कागदे व समाजसेवक रमेश सोनवणे यांच्या प्रयत्नाने सदरील भागाचा पाणीपुरवठा समस्या कायम स्वरूपी सुटला आहे. हे काम करण्याकरिता मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी त्वरित परवानगी दिली.



पाणीपुरवठा उपअभियंता प्रमोद माने सर यांनी तांत्रिक मान्यता देऊन पाईपलाईनचे काम त्वरित चालू करावे असे आदेश काढले. बीड शहर पाणीपुरवठा विभागाचे सुपरवायझर शेख अजहर यांनी गुत्तेदासकडे पाठपुरावा करून गुणवत्तेचे पाईप वापरून योग्य खोली करून पाईपलाईनचे काम तांत्रिक दृष्ट्या पूर्ण करून घेतले त्यामुळे (प्रेशर पाईप लाईन) भिमराज नगर राजुरी वेसे या भागाचा पाणीपुरवठा कायमस्वरूपी सुटला आहे पाणीपुरवठा उंची (प्रेशर) दहा फुटापर्यंत जात आहे. त्याबाबत रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पुजी कागदे व समाजसेवक रमेश सोनवणे व भिमराज नगर मधील सर्व नागरिकांनी बीड नगरपालिकेचे आणि संबंधित सुपारवायझर, कर्मचारी यांचे अभिनंदन केले. यावेळी अरुण कागदे, राजेश कागदे, अजिंक्य सोनवणे, आशिष यादव, विशाल साळवे, साहिल ओव्हाळ, रोहित धवन, यावेळी सर्व नागरिक आदी उपस्थित होते.

# राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करावी : नगरसेवक अ‍ॅड. जोगदंड

बीड । प्रतिनिधी

आपल्या धारदार लेखणीतून आत्मभान नसलेल्या, कष्टकरी कामगार मजुरांचे वंचित उपेक्षितांचे दाहक प्रश्न आणि त्यांचा इतिहास जगाच्या वेशीवर टांगून, भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच मार्क्स, लेनिन यांचा सामाजिक मूल्यवाद समाजातील तळगळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी, समाज प्रबोधनाचे प्रभावी शस्त्र वापरून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला सामाजिक परिवर्तनाचा अलंकार चढविणारे, लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात साजरी करावी, अशी मागणी भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक /अध्यक्ष तथा नगरसेवक अ‍ॅड. विकास जोगदंड यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.





रशिया सारख्या देशात मराठी भाषेची आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रचित करुन देणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे पहिले लेखक होते. जग बदल घालुनी घाव सांगून गेले आम्हा भिमराव असे सांगत प्रस्थापितांनी लादलेली गुलामगिरी लाथाडत जातीय द्वेषी मानसिकतेने बरबटलेल्या व्यवस्थेशी लढण्यासाठी एल्गार पुकारला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातच बहुजनांची क्रांती समावलेली आहे असा प्रत्यक्षात त्यांनी संदेश दिला आहे. अण्णाभाऊ साठेनीं आपल्या जिवंत साहित्यातून उपेक्षित समूहातील मानवाला नायक बनवले म्हणून राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT